SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
Estd : 1962
NAAC `A` Grade
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

## :: परिपत्रक ::

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

विद्यापीठ संलग्नित सर्व अशासकीय

शारीरिक शिक्षण महाविद्यालये,

विषय : अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.....

महोदय/महोदया,

मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांचेकडील जा.क्र. बीएड्.४६२०/प्र.क्र.९१(१)/मशि-२ दि. २१.१०.२०२० रोजीचे पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबतप्रमाणे अग्रेषित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रकानुसार योग्य ती कार्यवाही करून तत्सम कार्यवाहीबाबत विद्यापीठास अवगत करण्यात यावे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

संदर्भ क्र. : शिवाजी वि/संलग्नता/टी-२/बीएके/ ५७३

दि. 14 DEC 2020

E:\E\Baba\2017-18\Circular Format.Docx

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आवक विभाग :-
पी.सी./आय.पी.औ
02 DEC 2020
93

T2

महाराष्ट्र शासन

क्रमांक:बीएड-४६२०/प्र.क्र.२२(१)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ आक्टोबर, २०२०.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

संदर्भ :- (१) शासन पत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि.११.०७.२०१६.
(२) शासन पत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि.२७.०७.२०१७.
(३) शासन पत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि.१२.०७.२०१८.
(४) शासन पत्र क्रमांक:बीएड-४६१९/प्र.क्र.१२१(१)/मशि-२, दि.१२.०७.२०१९.
(५) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.बी.एड-२५२०/प्र.क्र.५१/सीईटीसेल/४३००, दि. ०४.०६.२०२०.

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधीच्या संदर्भाधीन क्रमांक ४ येथील पत्रान्वये, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिफारस केलेल्या, तसेच काही अटींच्या अधिन राहून शिफारस केलेल्या राज्यातील अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे :-

(क) एन.सी.टी.ई. ने संबंधित महाविद्यालयास शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, शासनाने सदर अभ्यासक्रमास यापूर्वी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी संलग्निकरण दिलेले आहे, याची खातरजमा संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता महाविद्यालयांची नोंदणी करताना करावी.

(ख) एन.सी.टी.ई. च्या नियमाप्रमाणे सदर अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्निकरण प्रदान करावे.

Shivaji University, Kolhapur
Affiliation T-
Inward No T1176
Date 03/12/2020

(ग) अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत बी.पी.एड. / एम.पी.एड. अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२३.५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब) व (क) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

(घ) सर्व विभागीय सहसंचालकांना शारिरीक शिक्षण महाविद्यालयाच्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व एन.सी.टी.ई. ने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ङ) ज्या महाविद्यालयांकडून सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता करण्यात येणार नाही, त्या महाविद्यालयांची नावे एन.सी.टी.ई. यांना कळविण्यात यावी, तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब संबंधित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(च) एन.सी.टी.ई.च्या सुधारित निकषांची पूर्तता न केल्याच्या कारणास्तव एन.सी.टी.ई. ने सदर महाविद्यालयाची मान्यता रद्द केल्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

आपला,

द. रा. कहार

( द. रा. कहार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत),
(३) सर्व संबंधित अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालये
(संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत),
(४) निवड नस्ती (मशि-२).